# महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती

प्रति, दिनांक :- २६ फेब्रुवारी २०२६

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,

महावितरण कंपनी, मर्या.,

प्रकाशगड, बांद्रा(पूर्व), मुंबई.

**विषय** :- सेवेत खंड (Break in Service) संदर्भातील बेकायदेशीर व अन्यायकारक निर्गमित केलेल्या सूचनांबाबत.

**संदर्भ** :- परिपत्रक क्र. मासं/शिनि-४/२०२६/५५५५ दि. १३.०२.२०२६

माननीय महोदय,

चर्चेअंती मागण्या मार्गी न लागल्यास त्याची पूर्तता करण्यास आंदोलन करण्याचा व प्रसंगी कामगार कायद्यांनुसार संप करण्याचा संविधानिक अधिकार भारतीय संविधानाचे कलम क्र. १९ (१) (अ), १९ (१) (इ) व १९ (१) (ब) नुसार सर्व भारतीय नागरिकांना देण्यात आलेले आहेत. ट्रेड युनियन ॲक्ट, १९२६ नुसार नोंदणीकृत संघटनांना सामुहिक चर्चा, वाटाघाटी करण्याचे व आंदोलन करण्याचे कायदेशीर अधिकार व हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच कायदेशीर संरक्षण सुद्धा देण्यात आले आहे. औद्योगिक विवाद कायदा, १९४७ नुसार दिलेल्या कायदेशीर नोटीस प्रमाणे कोणत्याही कर्मचाऱ्याने सामुहिक आंदोलनात सहभाग नोंदविल्यास थेट शिक्षा किंवा सेवा खंड (Break in Service) पडल्याचे ग्राह्य धरणे व त्यामुळे वेतन निश्चिती मूळ टप्प्यावर नेणे, उच्च वेतनश्रेणी लाभ काढून घेणे, पदोन्नतीसाठी सेवा लाभ ग्राह्य न धरणे, अंतिम उपदान पूर्णतः/अंशतः जप्त करणे, फौजदारी गुन्हा दाखल करणे, सेवेतून काढून टाकणे हे पूर्णतः बेकायदेशीर, घटनेची पायमल्ली करणारे, नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग करणारे व अनुचित कामगार पद्धती मध्ये मोडणारे आहे. कामगार कायद्यानुसार कामगारांच्या सेवा शर्तीवर परिणाम करणारी कोणतीही कारवाई न्यायालयाच्या आदेशाशिवाय करता येत नाही. संदर्भातील परिपत्रकामुळे व त्यातील बेकायदेशीर तरतुदींमुळे संघटना तयार करण्याचा, आंदोलन करण्याचा घटनादत्त अधिकार (Right to Freedom) कामगाराकांकडून हिरावल्या जाणार असून हे परिपत्रक घटनेने दिलेल्या अधिकाराची पायमल्ली करणारे आहे. त्यामुळे संदर्भातील परिपत्रक हे या सर्व बेकायदेशीर गोष्टींचा परिपाक असल्याने व सर्वस्वी अन्यायकारक असल्याने घटनेची व कायद्याची बूज राखण्यासाठी हे परिपत्रक तातडीने मागे घेवून रद्द करणे अत्यावश्यक आहे.

कृती समिती या परिपत्रकाचा तिव्र व कठोर शब्दात निषेध व्यक्त करत आहे व आग्रही मागणी करत आहे की, हे परिपत्रक तातडीने मागे घेण्यात येवून त्वरित रद्द करण्यात यावे.

औद्योगिक शांतता व सलोखा भंग होवू नये म्हणून आमच्या मागणीचा सकारात्मक विचार करून आमच्या मागणीस मान्यता द्यावी अशी आपणास विनंती आहे.

आपले विनित

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती

| | | |
|---|---|---|
| (कॉ. कृष्णा भोयर)<br>सरचिटणीस<br>महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन | (श्री. अरुण पिवळ)<br>महामंत्री<br>महाराष्ट्र वीज कामगार महासंघ | (श्री. संतोष खुमकर)<br>सरचिटणीस<br>सबॉर्डीनेट इंजिनियर असोसिएशन (म.रा.वि.मं.) |

(श्री. दत्तात्रेय गुट्टे)
मुख्य महासचिव
महाराष्ट्र राज्य वीज कामगार
काँग्रेस (इंटक)

(श्री. संजय मोरे)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय
विद्युत कर्मचारी संघटन

(कॉ. पी. बी. उके)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी
विद्युत वर्कर्स युनियन

(प्रभाकर लहाने)
सरचिटणीस
तांत्रिक कामगार यूनियन
रजि. नं. ५०५९

(श्री. दामोदर चंगोले)
उपमुख्य महासचिव
म. रा. राष्टीय वीज कामगार
फेडरेशन

(श्री. नवल दामले)
सरचिटणीस
ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असो.

(श्री. संजय खाडे)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
अधिकारी संघटना

(श्री. एम. एस. शरीकमसलत)
अध्यक्ष
राष्ट्रवादी वीज कामगार काँग्रेस

(श्री. नवनाथ पवार)
सरचिटणीस
म. रा. वि. ऑपरेटर संघटना

(श्री. व्ही. आर. जोनवाल)
अध्यक्ष
वीज निर्मिती कामगार संघटना

(श्री. विजय जाधव)
महासचिव,
फायनान्स ॲण्ड अकांउंट्स
एम्प्लॉईज युनियन

(श्री. ललित के. शेवाळे)
सरचिटणीस
क्रांतीकारी लाईनस्टाफ सेना

(श्री. दिपक बिडकर)
अध्यक्ष
म.रा.वि.मं. कार्यालयीन
अधिकारी/कर्मचारी संघटना

(श्री. अविनाश दि. जाधव)
सचिव
युनियन ऑफ केमिस्ट

**<u>प्रतिलिपी माहिती व कारवाई करता सादर.</u>**

१) मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

२) मा. अप्पर मुख्य सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३) मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई.

४) मा. संचालक (मानव संचालन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

५) मा. मुख्यऔद्योगिक संबंध अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.